International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.11 No.1 Sept-Oct 2023

# महाराष्ट्र राज्यातील कृषी पर्यटन केंद्राचा आर्थिक व सामाजिक अभ्यास विशेष संदर्भ पश्चिम महाराष्ट्र

**प्रतिभा शिवाजी गायकवाड**
Corresponding Author – प्रतिभा शिवाजी गायकवाड
DOI- 10.5281/zenodo.10156191

**गोषवारा –**

कृषी पर्यटन  नवीन व्यवसाय म्हणून उदयास आले आहे तर काही देशात येत आहेत. जगभरातील शेतकऱ्यांचा कृषी पर्यटन हे शेतीसाठी पूरक व्यवसाय म्हणून चांगला जम बसत आहे. कृषी पर्यटनाची संकल्पना ही शाश्वत आणि पर्यावरणपूरक विकासावर आधारित असल्यामुळे पर्यावरणाला इतर उद्योग धंद्यासारखा कोणतेही नुकसान किंवा हानी होत नाही. देशात कृषी पर्यटन ही चळवळ सर्व प्रथम महाराष्ट्रात सुरू झाली. पहिले कृषी पर्यटनही महाराष्ट्रातच सुरू केली गेली. महाराष्ट्रामध्ये मोठ्या प्रमाणात कृषी पर्यटन केंद्रांची संख्या वाढत आहेत. येणाऱ्या काळात मोठ्या प्रमाणात महाराष्ट्रभर कृषी पर्यटन केंद्रांची संख्या वाढतील यात काही शंका नाही.

**प्रस्तावना –**

कृषी पर्यटन हि पर्यटनातील वेगळी संकल्पना आहे. विशेषत: शेती संबंधीत ही संकल्पना असल्यामुळे भारतासारख्या अनेक शेती प्रधान देशात कृषी पर्यटनाला जास्त महत्व आहे. जगभरात पर्यटन हा व्यवसाय वेगाने वाढत आहे. कृषी पर्यटन आर्थिकदृष्या शेतकऱ्यांना परवडणारा व्यवसाय आहे. कृषी पर्यटनातून गावाचा, राज्याचा आणि देशाचा विकास होत असल्याचे अनेक उदाहरणे आहेत. उदा: ऑस्ट्रेलिया, ब्राझील, न्यूझीलंड आणि युरोप इ. देश. मुळात कृषी पर्यटनाची संकल्पना / उगम ऑस्ट्रेलिया, ब्राझील, न्यूझीलंड  या देशात झाल्याची नोंद आहे. जगभरात कृषी पर्यटनउद्योग अनेक देशात उद्योग क्षेत्र म्हणून उभा राहत आहे. ऑस्ट्रेलिया, युरोप, अमेरिका, (संयुक्त राष्ट्रे) मलेशिया, कॅनडा, फिलिपिन्स आणि भारत इत्यादी देशाला कृषी पर्यटनाचे महत्व समजल्यामुळे व्यवसाय म्हणून मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. याचे उत्तम उदाहरण म्हणजे जगभर मंदी असताना मलेशिया देशाने युरोपीयन देशात जाऊन कृषी पर्यटन म्हणजे काय, कृषी पर्यटनातून मलेशिया आर्थिकदृष्या कसे सावरू शकले याचा अभ्यास करण्यासाठी मलेशिया सरकारतर्फे अभ्यासदौरा आखला होता.

**संशोधन विषयाची निवड –** महाराष्ट्राचा कृषी पर्यटन व्यवसायात देशात पहिला क्रमांक लागतो.महाराष्ट्र राज्यातील कृषी पर्यटन स्थळांच्या माध्यमातून आर्थिक व सामाजिक विकास कसा साधता येईल याचा अभ्यास केला आहे .तसेच कृषी पर्यटन केंद्राच्या कार्यपद्धतीचा अभ्यास कृषी पर्यटन केंद्र चालवताना येणाऱ्या समस्या अडचणींचा अभ्यास करून त्यावर आवश्यक त्या उपाययोजना करण्यासाठी  संशोधन विषयाची निवड केली आहे. महाराष्ट्रातील कृषी पर्यटन केंद्रांची संख्या ही देशातील इतर राज्यांच्या तुलनेत सर्वाधिक आहे म्हणून **"महाराष्ट्र राज्यातील कृषी पर्यटन केंद्राचा आर्थिक व सामाजिक अभ्यास"- विशेष संदर्भ पश्चिम महाराष्ट्र** संशोधन विषयाची निवड केली आहे.

**संशोधन विषयाचे महत्त्व –** संशोधिकेने संशोधन विषयाचे महत्त्व पुढीलप्रमाणे मांडले आहे.

१. कृषी पर्यटनामुळे राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होत आहे. कृषीपर्यटन केंद्राच्या ठिकाणी हॉटेल्स, विविध खाद्यपदार्थ दुकाने, विविध पेय यावर सरकारचा कर लावलेला असतो. या कराच्या माध्यमातून सरकारला उत्पन्न मिळते. अर्थव्यवस्था विकसित होण्यामध्ये त्याचा उपयोग होतो. या दृष्टिकोनातून सुद्धा प्रस्तुत संशोधन महत्त्वाचे आहे.

२. कृषी पर्यटन केंद्रांना विदेशी पर्यटक, विविध प्रांतातून आलेले लोक भेटी देत असतात. त्यामुळे त्यातून त्यांची संस्कृती, विविध प्रांतातील स्थानिक कला, शेती विषयी संपूर्ण माहिती समाजास मिळते.  यातून भाषावाद, प्रांतवाद दूर होण्यास मदत होते यामुळे संशोधन महत्त्वाचे आहे.

३. कृषी पर्यटन केंद्र चालवत असताना येणाऱ्या अडचणी, समस्या यांचा अभ्यास करून त्यावर उपाययोजना सुचवणे या मार्फत शक्य आहे. कृषी पर्यटन केंद्रांना या संशोधनातील माहितीचा उपयोग आपल्या समस्या सोडवण्यासाठी आणि कार्यपद्धतीत सुधारणा घडवून आणण्यासाठी होईल. तसेच या पुढील काळात कृषी पर्यटन विषयी संशोधन करताना संशोधकांना हा प्रबंध मार्गदर्शक ठरेल म्हणून प्रस्तुत संशोधन महत्त्वाचे आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे –** प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्टे संशोधिकेने पुढीलप्रमाणे निर्धारित केली आहेत.

1. कृषी पर्यटन केंद्रांच्या माध्यमातून मिळणारा रोजगार आणि उत्पन्न यांचा अभ्यास करणे.

2. कृषी पर्यटन केंद्राकडून पुरवल्या जाणाऱ्या सेवा सुविधांचा अभ्यास करणे.
3. कृषी पर्यटन केंद्रांना भेट देणाऱ्या पर्यटकांच्या वाढीचा कल अभ्यासणे.

**गृहितकृत्ये -**

१. कृषी पर्यटनापासून मिळणाऱ्या रोजगार आणि उत्पन्नात वाढ होत आहे.

२. कृषी पर्यटन केंद्राकडून मिळणाऱ्या सेवा सुविधांपासून पर्यटक समाधानी आहेत.

**संशोधन पद्धती –** प्रस्तुत संशोधनासाठी विगमन पद्धतीचा वापर केला आहे. या पद्धतीचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे या पद्धतीत काही गोष्टी गृहीत धरून संशोधन केले जाते. प्रस्तुत संशोधनाचा प्रकार वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक आहे. संशोधन उद्दिष्टांच्या आधारे संशोधन आराखडा तयार करून निश्चित केला आहे.

**तथ्य संकलन –** कोणत्याही शास्त्राच्या संशोधन प्रक्रियेत तथ्य संकलित करण्याला अत्यंत महत्त्वाचे स्थान असते. अर्थशास्त्रात तथ्य संकलनाला विशेष महत्त्व दिले जाते. महाराष्ट्र राज्यातील कृषी पर्यटन केंद्रांचा आर्थिक व सामाजिक अभ्यास करण्यासाठी पुढीलप्रमाणे तथ्यसंकलन करण्यात आले आहे.

**अ) प्राथमिक तथ्य –** संशोधनकर्ता स्वतः अध्ययनक्षेत्रात जाऊन त्या विषयाच्या किंवा समस्येच्या सबंधात व्यक्तींकडून मुलाखत, अनुसूची किंवा प्रश्नावलीच्या सहाय्याने किंवा प्रत्यक्ष निरीक्षणाद्वारा जी माहिती तथ्ये जमा करतो त्याला प्राथमिक तथ्य असे म्हणतात. संशोधनात प्राथमिक तथ्य संकलनासाठी प्रश्नावली पद्धती वापरली आहे.

**ब ) द्वितीय किंवा दुय्यम तथ्ये –** दुय्यम तथ्य ही इतर व्यक्तींनी पूर्वीच गोळा केली असून ती लिखित स्वरूपाची असतात. संशोधनकर्ता या तथ्यांचा आपल्या संशोधनासाठी उपयोग करतो. द्वितीय तथ्य ही प्रकाशित व अप्रकाशित रेकोर्ड, अहवाल, सांख्यिकी, हस्तलिखित, पत्रे, दैनंदिनी इत्यादीपासून संशोधनकर्ता माहिती प्राप्त करतो. प्रस्तुत संशोधनासाठी सार्वजनिक प्रलेखांचा वापर केला आहे त्यामध्ये रेकॉर्ड, पुस्तके, संदर्भग्रंथ, जनगणना अहवाल, विविध आयोग आणि समितीचे अहवाल, वृत्तपत्रे, साप्ताहिके, मासिके, इंटरनेट यांचा वापर केला आहे.

**नमुना निवड –** संशोधनासाठी पश्चिम महाराष्ट्रातील अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर या सहा म्हणजे शंभर टक्के जिल्ह्यांची निवड करण्यात आली आहे. कृषी पर्यटन केंद्राची निवड करताना सहेतूक किंवा उद्देश पूर्ण नमुना पद्धतीचा वापर केला आहे. प्रत्येक जिल्ह्यात कृषी पर्यटन केंद्र कमी अधिक प्रमाणात असल्यामुळे या पद्धतीचा अवलंब केला आहे. महाराष्ट्रातील एकूण ४५८ नमुना पर्यटन केंद्रापैकी पश्चिम महाराष्ट्रात ३३५ (१७.१%) पर्यटन केंद्रे आहेत त्यापैकी संशोधनासाठी २५२ (७५.०% (कृषी पर्यटन केंद्रांची निवड केली आहे. पर्यटन केंद्राच्या मालकाकडून म्हणजेच व्यवसायिककडून प्रश्नावलीच्या आधारे वास्तविक तथे संकलित केली आहेत.

**गृहीतकृत्याची सत्यता –** संशोधिकेने गृहीतकृत्याची सत्यता पुढीलप्रमाणे पडताळून पाहिली आहे.

**१) कृषी पर्यटनापासून मिळणाऱ्या रोजगार आणि उत्पन्नात वाढ होत आहे.**

**कृषी पर्यटन व रोजगाराबाबतचा अभिप्राय**

| जिल्हे | कृषी पर्यटनामुळे रोजगारात वाढ होते काय.आपला अभिप्राय सांगा ? | | | कृषी पर्यटनामुळे उत्पन्नात वाढ झाली आहे काय.आपला अभिप्राय सांगा ? | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | सहमत | असहमत | एकूण | सहमत | असहमत | एकूण |
| **अहमदनगर** | ०९<br>(९०.०) | ०१<br>(१०.०) | **१०**<br>**(१००)** | ०८<br>)८०.०( | ०२<br>)२०.०( | **१०**<br>**(१००)** |
| **पुणे** | ९६<br>(९५.१) | ०५<br>(४.९) | **१०१**<br>**(१००)** | ९५<br>)९४.०( | ०६<br>)६.०( | **१०१**<br>**(१००)** |
| **सातारा** | ६९<br>(९२.०) | ०६<br>(८.०) | **७५**<br>**(१००)** | ६१<br>)८१.३( | १४<br>)१८.७( | **७५**<br>**(१००)** |
| **सांगली** | ०६<br>(८५.७) | ०१<br>(१४.३) | **०७**<br>**(१००)** | ०५<br>)७१.४( | ०२<br>)२८.६( | **०७**<br>**(१००)** |
| **सोलापूर** | ०५<br>(८३.४) | ०१<br>(१६.६) | **०६**<br>**(१००)** | ०५<br>)८३.३( | ०१<br>)१६.७( | **०६**<br>**(१००)** |
| **कोल्हापूर** | ५२<br>(९८.१) | ०१<br>(१.९) | **५३**<br>**(१००)** | ५०<br>)९४.३( | ०२<br>)३.७( | **५३**<br>**(१००)** |
| **एकूण** | **२३७** | **१५** | **२५२** | **२२५** | **२७** | **२५२** |



*प्रतिभा शिवाजी गायकवाड*

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | (९४.०) | (६.०) | (१००) | )८९.२( | )१०.३( | (१००) |

**H0 – कृषी पर्यटनापासून मिळणाऱ्या रोजगार आणि उत्पन्नात वाढ होत नाही.**

**H1 - कृषी पर्यटनापासून मिळणाऱ्या रोजगार आणि उत्पन्नात वाढ होत आहे.**

Z TEST =

Significance Level – (α) = 0.05

$\mu_0$= Assume Mean २

z-Test: Two Sample for Means

| **रोजगारात वाढ** | | | **उत्पन्नात वाढ** | | |
|---|---|---|---|---|---|
| | **सहमत** | **असहमत** | | **सहमत** | **असहमत** |
| Mean | 39.5 | 2.5 | Mean | 37.33333 | 4.5 |
| Known Variance | 1492.3 | 5.5 | Known Variance | 1399.4 | 24.7 |
| Observations | 6 | 6 | Observations | 6 | 6 |
| Hypothesized Mean Difference | 2 | | Hypothesized Mean Difference | 0 | |
| z | 2.215219452 | | Z | 2.131181 | |
| P(Z<=z) one-tail | **0.013372503** | | P(Z<=z) one-tail | **0.016537** | |
| z Critical one-tail | 1.644853627 | | z Critical one-tail | 1.644854 | |
| P(Z<=z) two-tail | **0.026745005** | | P(Z<=z) two-tail | **0.033074** | |
| z Critical two-tail | 1.959963985 | | z Critical two-tail | 1.959964 | |

वरील दोन्ही तक्त्यामध्ये एकूण सहा निरीक्षणे आहेत त्यामध्ये सरासरी ३७नमुना संशोधनात्मक ३. नमुना ५.४ गृहीतकृत्य विधानाशी सहमत आहे तर सरासरी असहमत असल्याचे दिसून येते. गृहित मध्यातील फरक २ असून लक्षणीय पातळी ०मानली आहे ०५.. चाचणीचा z p वापर करून-मूल्य काढले असता असे दिसून आले कि, -pमूल्य हे ०पेक्षा कमी आहे ०५.. यावरून असे स्पष्ट होते किसंशोधनात्मक गृहीतकृत्य स्वीकारले असून शून्य , याचाच अर्थ .गृहीतकृत्य नाकारले आहेकृषी पर्यटनापासून मिळणाऱ्या रोजगार आणि उत्पन्नात वाढ होत आहे.

**गृहीतक 2 - कृषी पर्यटन केंद्राकडून मिळणाऱ्या सेवा सुविधांपासून पर्यटक समाधानी आहेत.**

**कृषी पर्यटनामुळे पर्यटकांना मिळणाऱ्या सेवा सुविधांच्या समाधानकारकतेचा अभिप्राय**

| **जिल्हे** | **कृषी पर्यटनामुळे पर्यटकांना मिळणाऱ्या सेवा सुविधा समाधानकारक आहेत काय.याबाबत आपला अभिप्राय सांगा ?** | | |
|---|---|---|---|
| | **समाधानकारक आहे** | **समाधानकारक नाही** | **एकूण** |
| अहमदनगर | ०८<br>)८०.०( | ०२<br>)२०.०( | १०<br>)१००( |
| पुणे | ७९<br>)७८.२( | २२<br>)२१.८( | १०१<br>)१००( |
| सातारा | ६५<br>)८६.७( | १०<br>)१३.३( | ७५<br>)१००( |
| सांगली | ०६<br>)८५.८( | ०१<br>)१४.२( | ०७<br>)१००( |
| सोलापूर | ०५<br>)८३.३( | ०२<br>)१६.६( | ०६<br>)१००( |
| कोल्हापूर | ४७<br>)८८.७( | ०६<br>)११.३( | ५३<br>)१००( |
| एकूण | २१०<br>)८३.४( | ४२<br>)१६.६( | २५२<br>)१००( |

– $_0$**H**कृषी पर्यटन केंद्राकडून मिळणाऱ्या सेवा सुविधांपासून पर्यटक असमाधानी आहेत.

- $_1$Hकृषी पर्यटन केंद्राकडून मिळणाऱ्या सेवा सुविधांपासून पर्यटक समाधानी आहेत.

Z TEST =
Significance Level – (α) = 0.05
$\mu_0$= Assume Mean 0

z-Test: Two Sample for Means

| | सहमत आहे | सहमत नाही |
|---|---|---|
| Mean | **35.0** | **7.2** |
| Known Variance | 1090 | 64.1 |
| Observations | 6 | 6 |
| Hypothesized Mean Difference | 0 | |
| z | 2.006869467 | |
| P(Z<=z) one-tail | **0.022381782** | |
| z Critical one-tail | 1.644853627 | |
| P(Z<=z) two-tail | **0.044763564** | |
| z Critical two-tail | 1.959963985 | |

वरील दोन्ही तक्त्यामध्ये एकूण सहा निरीक्षणे आहेत त्यामध्ये सरासरी ३५नमुना संशोधनात्मक ०. नमुना २.७ गृहीतकृत्य विधानाशी सहमत आहे तर सरासरी असहमत असल्याचे दिसून येते. गृहित मध्यातील फरक २ असून लक्षणीय पातळी ०मानली आहे ०५.. चाचणीचा z p वापर करून-मूल्य काढले असता असे दिसून आले कि ,p-० मूल्य हे.०५ पेक्षा कमी आहे ,यावरून असे स्पष्ट होते कि . संशोधनात्मक गृहीतकृत्य स्वीकारले असून शून्य गृहीतकृत्य याचाच अर्थ .नाकारले आहेकृषी पर्यटन केंद्राकडून मिळणाऱ्या सेवा सुविधांपासून पर्यटक समाधानी आहेत.

**महत्त्वाचे निष्कर्ष –** प्राथमिक माहितीच्या आधारे केलेल्या संशोधनातून पुढील महत्त्वाचे निष्कर्ष प्राप्त झाले आहेत.

१. पश्चिम महाराष्ट्रातील कृषी पर्यटन केंद्राच्या पाहणीतून असे दिसून आले की कृषी पर्यटन केंद्र हे प्रमुख शहरापासून ० ते २५ किलोमीटर अंतरावर असणारे नमुना २१ ३.८)%( व्यावसायिक, सव्वीस ते पन्नास किलोमीटर अंतरावर असणारे ६१ २.२४)%( व्यावसायिक, ५१ ते ७५ किलोमीटर अंतर असणारे १०५ ६.४१)%( व्यावसायिक, ७६ किलोमीटर पेक्षा जास्त अंतर असणारे ६५ ९.२५)%( व्यावसायिक असल्याचे दिसून आले असून सर्वाधिक ५१ ते ७५ किलोमीटर अंतर असणारे १०५ ६.४१)%( व्यावसायिक आहेत तर झिरो ते २५ किलोमीटर अंतर असणारे २१ ३.८)%( कमीत कमी व्यावसायिक असल्याचे स्पष्ट झाले आहे.

२. कृषी पर्यटन केंद्र चालवत असताना नमुना २५२ व्यावसायिकांपैकी नमुना २० ९.७)%( व्यावसायिकांनी दैनंदिन पाच हजार रुपये खर्च केला आहे. ५००१, ते १००००, रुपये खर्च करणारे ५२ ६.२०)%( कृषी पर्यटन व्यावसायिक आहेत. १०००१, ते २००००, रुपये खर्च करणारे ५८ ०.२३)%( कृषी पर्यटन व्यवसायिक आहेत तर २० ०००,पेक्षा जास्त खर्च करणारे १२२ ५.४८)%( कृषी पर्यटन व्यावसायिक आहेत. यावरून असे स्पष्ट होते की, दैनंदिन स्वरूपात अधिक खर्च करणारे १२२ ५.४८)%( व्यावसायिक असून कमीत कमी

३. पश्चिम महाराष्ट्रातील कृषी पर्यटन केंद्रात भोजन स्वच्छतागृह सुरक्षा व्यवस्था आरोग्य व्यवस्था करमणुकीच्या सुविधा रोजगार या सुविधा पुरविल्या जात असल्याचे प्राथमिक माहितीच्या आधारे स्पष्ट झाले आहे.

४. पश्चिम महाराष्ट्रातील कृषी पर्यटन केंद्रात नमुना १४० ६.५५)%( व्यावसायिकांनी मुक्कामासाठी झोपडी, नमुना ४७ ६.१८)%( व्यावसायिकांनी टेन्ट, नमुना ६५ ८.२५)%( व्यावसायिकांनी लॉजिंगची व्यवस्था राहण्यासाठी केल्याचे संशोधनातून दिसून आले आहे. सर्वाधिक व्यवसायिकांनी झोपडीची व्यवस्था केल्याचे पहावयास मिळते.

५. पश्चिम महाराष्ट्रातील कृषी पर्यटन केंद्रात शिबिरे आयोजन करणारे ४२ ७.१६)%(, कार्यशाळांचे आयोजन करणारे ५१ २.२०)%(, विवाह सोहळ्याचे आयोजन करणारे १९ ५.७)%(, वाढदिवस आयोजन करणारे ३५ ९.१३)%(, सण उत्सवाचे आयोजन करणारे ४५ ९.१७)%आणि ( इतर कार्यक्रमांचे आयोजन करणारे ६० ८.२३)%( व्यावसायिक असल्याचे संशोधनातून दिसून आली आहे. यावरून असे स्पष्ट होते की, इतर कार्यक्रमाबरोबरच सण ,उत्सव, वाढदिवस यांचे मोठ्या प्रमाणात आयोजन केले जाते.

६. पश्चिम महाराष्ट्रातील नमुना २५२ कृषी पर्यटन व्यवसायकांपैकी नमुना २३४ ८.९२)%( कृषी पर्यटन व्यवसायिकांनी शेतमालाचे उत्पादन करून विक्री केली आहेत तर नमुना १८ २.७)%( व्यवसायिकांनी शेतमालाचे उत्पादन व विक्रीही केली नाही.

व्यावसायिकांपैकी फळांची उत्पादन व विक्री करणारे २६ १.११)%(, धान्य उत्पादन व विक्री करणारे १७ ३.७)%(, औषधी वनस्पती ४३ ३.१८)%(, लाकूड ०९ ८.३)%(, फुले ३५ ९.१४)%(, मसाल्याचे पदार्थ १० (%३.४), भाजीपाला ९४ ३.४०)%( व्यवसायिकांचा समावेश असल्याचे दिसून आले आहे. सर्वाधिक प्रमाणात भाजीपाला औषधी वनस्पती यांचे उत्पादन व विक्री केली जात असल्याचे आढळून आले आहे.

७. पश्चिम महाराष्ट्रातील कृषी पर्यटन व्यवसायातील फायदेशीरता पाहता चांगला असल्याचे नमुना १३७ ५.५४)%( फायदेशीर असल्याचे असल्याचे ५३ (%०.२१) फायद्याची सुरुवात असल्याचे ५३ (%०.२१)आणि तोट्याचा असल्याचे ०९ ६.३)%( व्यावसायिकांनी स्पष्ट केले आहे. असे स्पष्ट होते की, सर्वाधिक व्यवसायिकांनी हा व्यवसाय चांगला व फायदेशीर असल्याचे स्पष्ट केले आहे.

८. कृषी पर्यटन व्यवसायापासून कर्जबाजारीपणामध्ये घट झाल्याचे नमुना २३८ ५.९४)%( व्यावसायिकांनी स्पष्ट केले असून १४ ५.५)%( व्यवसाय त्यांनी कृषी पर्यटन व्यवसायामुळे कर्जबाजारीपणात घट झाली नाही असा प्रतिसाद नोंदविला आहे.

९. कृषी पर्यटनामुळे रोजगारात वाढ होते असे मत नमुना २३७ )९४.०(% व्यावसायिकांनी स्पष्ट केले असून अजूनही १५ ०.६)%( व्यवसायिकांनी कृषी प्रक्रियेमुळे रोजगारात फारशी वाढ होत नाही असा अभिप्राय दर्शविल्याचे संशोधनातून आढळून आले आहे.

**शिफारसी –**

१. कृषी पर्यटन व्यवसायिकांना मूलभूत शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून द्यावी. सेवांतर्गत प्रशिक्षण दिल्यास कुशल व्यावसायिक उपलब्ध होतील.

२. २० ते ४० वयोगटातील तरुणांना कृषी पर्यटन व्यवसायात आकर्षित करण्यासाठी शासनाने प्रोत्साहन द्यावे.

३. आंतरराष्ट्रीय पर्यटकांचा ओघ वाढविण्यासाठी सरकारने आंतरराष्ट्रीय पर्यटकांच्या सुरक्षिततेची हमी द्यावी आणि पर्यटकांना उत्तम दर्जाच्या सुविधा कृषी पर्यटन केंद्रातच उपलब्ध करून द्याव्यात.

४. कृषी पर्यटन व्यवसायाच्या विकासासाठी केंद्र व राज्य सरकारने कृषी पर्यटन विकास निधी स्थापन करावा आणि त्याचा त्याच कामासाठी उपयोग करावा.

५. कृषी पर्यटन व्यवसायात कायम रोजगार निर्मितीसाठी सरकारने धोरण निश्चित करावे. कृषी पर्यटन व्यवसायाच्या विकासासाठी कुशल मनुष्यबळ उपलब्ध करून द्यावे.

६. पर्यटन व्यवसायिकांना विम्याची सुविधा अत्यावश्यक व बंधनकारक करण्यात यावी.

७. कृषी पर्यटन केंद्राची माहिती पोहोचवण्यासाठी वृत्तपत्रे, दूरदर्शन, व्हाट्सअप, फेसबुक व अत्याधुनिक सोशल मीडियाची मदत सरकारने घ्यावी.

८. कृषी पर्यटन केंद्राचा ऐतिहासिक, सामाजिक, धार्मिक वारसा जतन करून ठेवण्यासाठी सरकारने देखभाल करणे आवश्यक आहे.

९. कृषी पर्यटकांना येण्यासाठी विशेष सवलती सरकारने द्याव्यात.

१०. मादक पेयांच्या सेवनासाठी आणि लैंगिक उद्देशाने होणारे पर्यटन यावर सरकारने विशेष पोलीस यंत्रणेद्वारे लक्ष ठेवणे आवश्यक आहे.

११. नाबार्ड या संस्थेतून कृषी पर्यटनासाठी आर्थिक तरतूद करावी व त्याचा उपयोग कृषी प्रकरणासाठीच केला जावा असे धोरण सरकारने निश्चित करावे.

१२. कृषी पर्यटन केंद्र हे शांत, सुंदर अशा ठिकाणी असावे. गर्द झाडी, नद्या, नाले आसपास असावेत.

१३. कृषी पर्यटन केंद्र मालकास नोंदणी प्रमाणपत्राच्या आधारे बँक लोनची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सरकारने प्रयत्न करावेत.

**संदर्भग्रंथ –**


१. Lundberg. G. A. (1951), Social Research, Longmans Green and Com, New York.
२. Goode William J. and Hatt, Paul. K. (1981), Methods in Social Research McGrew - Hill International Book Company, New Delhi.
३. Kothari C. R. (1993) Research Methodology - Methods and Techniques, Wiley Eastern Limited, New Delhi .
४. Young Pauline V. (1982), Scientific Social Survey and Research, Prentice- Hall of India, Private Limited, New Delhi.
५. तावरे पांडुरंग, )सप्टेंबर २०१८ (, कृषी व ग्रामीण पर्यटन मार्गदर्शिका, कृषी पर्यटन विकास संस्था, पळशीवाडी, बारामती, पुणे.
६. काटोले रवींद्र, )जानेवारी २०१४(, समृद्धीचा महामार्ग-कृषी पर्यटन, गोडवा कृषी प्रकाशन, पुणे.
७. गोजरे नंदकिशोर ,(जून २०१९(, कृषी पर्यटन उद्योग, चेतक बुक्स पब्लिकेशन,पुणे.
८. महादार आणि अनिल, )जानेवारी २०२०(, कृषी प्रकल्प, सकाळ पब्लिकेशन, पुणे.
९. हाडवळे मनोज ,(मे२०२१(, कृषी पर्यटन शेती पूरक व्यवसाय, सकाळ प्रकाशन, पुणे.